॥ श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ॥

बारा गावांचे स्वयंभू जागृत देवस्थान

# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी - ४१५ ८०५

(ट्रस्ट रजि. नं. ए-६७ नोंदणी वर्ष- सन १९५२)

# वार्षिक अहवाल

(वर्ष सन २०२४-२५)





–: सिंहासन :–

कार्तिक शुद्ध १० शके १९४६ सोमवार दिनांक११ नोव्हेंबर २०२४

६०–७१० किलो एकूण वजन (लाकूडकाम व चांदीकाम सह)

– ४३–२९७ किलो – वजा लाकडी सिंहासन,मोळे, खिळे,पट्टी वगैरे

१७–४१३ किलो चांदी वजन



–: प्रभावळ :–

कार्तिक शुद्ध १० शके १९४६ सोमवार दिनांक११ नोव्हेंबर २०२४

२८–३७० किलो एकूण वजन (लाकूडकाम व चांदीकाम सह)

– १८–१०४ किलो – वजा लाकडी सिंहासन,मोळे, खिळे वगैरे

१०–२६६ किलो चांदी वजन




–: पालखी :–

कार्तिक शुद्ध १० शके १९४६ सोमवार दिनांक११ नोव्हेंबर २०२४

४९–७१० किलो एकूण वजन (लाकूडकाम व चांदीकाम सह)

– २५–७३९ किलो – वजा लाकडी सिंहासन, मोळे, खिळे वगैरे

२३–९७१ किलो चांदी वजन



॥ श्री देव अंजनेश्वर प्रसन्न ॥

बारा गावाचे जागृत देवस्थान



# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

(ट्रस्ट रजिस्ट्रेशन नं. ए–६७ / दि.१७.११.१९५२)
(आयकर नोंदणी नं. AARTS7339F22PN01 / दि.२८.०२.२०२३ )
(दर्पण नोंदणी नं.  MH/2025/0720285 / दि.१०.०७.२०२५ )
(टॅन नोंदणी नं. KLPS16433E / दि.०९.०५.२०२४ )

## -निमंत्रण -

स.न.वि.वि.

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीदेव अंजनेश्वरचा वार्षिक कार्तिकोत्सव मिती कार्तिक शुद्ध दशमी ते कार्तिक पौर्णिमा, **शनिवार दिनांक १ नोव्हेंबर २०२५ ते बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२५** असा पाच दिवसांचा आहे. उत्सव काळातील पाच दिवसामध्ये आरती, भोवती, कीर्तन हे प्रथेप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. तरी आपण सर्वांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व यथाशक्ती देणगी पाठवावी, ही विनंती.

आपला नम्र,

**डॉ. मिलिंद देसाई**
विश्वस्त,
संपर्कासाठी मोबा नं.९८२३२७७३२६ (whats app)
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
ई–मेलआयडी– shridevanjaneshwar@gmail.com
वेबसाईट– shridevanjaneshwar@gmail.com
व्हाटस अप पब्लीक चॅनेल – श्री देव अंजनेश्वर देवस्थान

## ✻ कार्तिकोत्सवातील कार्यक्रम ✻

- प्रतिवर्षीप्रमाणे रोज रात्री ठीक ९.०० वाजता धुपारती. आरती व पालखी प्रदक्षिणा होईल. रोज रात्री ठीक १० वाजता **ह. भ. प. श्री. कौस्तुभ परांजपे,** पुणे यांचे कीर्तन होईल.

- रविवार दि.०२.११.२०२५ रोजी रात्री ठीक ८.०० वाजता तुळसीविवाह समारंभ होईल.

- बुधवार दि.०५.११.२०२५ रोजी सकाळी १० वाजता बलीपूजन कार्यक्रम सुरु होईल.
  दुपारी १२.०० वाजता श्रीदेवाला महाप्रसाद दाखवण्यात येईल आणि त्यानंतर
  दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत सर्व भाविक भक्तासाठी महाप्रसाद मिळेल.
  कृपया महाप्रसादासाठी सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे.
  संध्याकाळी ७.०० वाजता त्रिपूरपूजन होईल. त्यानंतर स्थानिक भजनांचा कार्यक्रम होईल.
  रात्री १२.०० वा. आरती, भोवती, लोटांगण, दरबार झाडणे आदी कार्यक्रम होतील.
  रात्री २.०० वाजता लळीताचे कीर्तन सुरू होईल.
  सकाळी ४.०० वाजेपर्यंत उत्सवाची सांगता होईल.

✻ टिप – कार्यक्रमातील बदल अंजनेश्वर व्हाटसअपपेज व फेसबुकपेज सह वेबसाईट वर सांगितले जातील.

## ✻ महत्वाच्या सूचना ✻

- देणगीदारांनी आपली देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात थेटपणे जमा करावी.
- क्यूआरकोडने अंजनेश्वर साठीची देणगी थेटपणे बँकखात्यात पाठवता येते. सर्व पेमेंट ॲप च्या सहाय्याने रक्कम थेटपणे अंजनेश्वर बँक खात्याला जमा होत असल्याने हा मार्ग सगळ्यात सर्वोत्तम आहे. तरी आमची विनंती आहे की यापुढे अंजनेश्वरसाठी देणगी देण्यासाठी क्यूआरकोडचा वापर करावा. क्यूआरकोडने देणगी पाठवून झाल्यावर पेमेंटस्क्रीनशॉट आणि देणगीदाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड / मोबाईल नंबरसह) पाठवण्यास विसरू नये.. सोबत क्यूआरकोडच दिला आहे..
- देणगी पाठविण्यासाठी बँक खात्यांचे तपशील

**१) श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**

**A/c No-0080001010001712**

**IFSC code-ICIC00RUCBL**

**राजापूर अर्बन को.बँक लि .राजापूर,**

**जानशी पठार शाखा**

**२) श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**

**A/c No-143710100000001**

**IFSC code-BKID0001437**

**बँक ऑफ इंडिया, मिठगवाणे शाखा**

UPI ID: shridevanjaneshwar@okicici

- क्यूआर स्कॅन करून देणगी पाठवता येईल. तसेच एनईएफटी /आरटीजीएस द्वारे देणगी पाठवता येईल. देणगी श्रीदेवाच्या बँकखात्यात जमा केल्यावर पेमेंटस्क्रीनशॉट व आपला पूर्ण पत्ता (पिनकोड व मोबाईल नंबर सह) whats app no. ९८२३२७७३२६ वर मेसेज करून कळवला पाहिजे. भाविक भक्तांनी आपली देणगी थेट श्रीदेवाच्या बँक खात्यात पाठवण्यास प्राधान्य द्यावे. आपला पूर्ण पत्ता ९८२३२७७३२६ या व्हाटस्‌अप नंबरला मेसेज करून पाठवल्यावर देणगीपावती बनवून आपल्याला पोस्टाद्वारे पाठविणे, प्रसाद/अंगारा पाठविणे सोयीचे होईल. **कृपया बँकेत जमा केलेल्या देणगीचा तपशील न विसरता पाठवावा.**
- देणगीदारांना कोणत्याही बँकेत स्वत:च्या नावाने मुदत ठेव ठेवून त्याचे तिमाही अथवा वार्षिक व्याज श्रीदेवाच्या बँक खात्याला ट्रान्स्फर करता येईल. आपल्या व्याजाची रक्कम वर्षभर होणाऱ्या सर्व धार्मिकांसाठी व देवस्थान सुधारणेसाठी खर्च होईल. अशी मुदत ठेव किमान रु.१० हजार किंवा समान पटीत असावी, अशी विनंती आहे. या देणगीदारांची नावे कायम देणगीदार या सदराखाली येतील. व्याज जमा झाल्यावर देणगी पावती/प्रसाद पाठवणे ही देवस्थानची जबाबदारी राहील.
- दानासाठी दानपेटी- ✻ दानपेटी मधील एक रुपया पासूनचे अर्पणदान देवाच्या बँक खात्यात थेटपणे जमा होत असते आणि त्यामधून मंदिराचे दैनंदिन गरजा, खर्च, उत्सवखर्च, धार्मिक कार्यक्रमांचे खर्च होत असतात. भाविक भक्तांना आपले गुप्तदान, निनावी देणगी दानपेटीतच अर्पण करावी.

  ✻✻ .दानपेटीत जमा झालेल्या दानाचा विनियोग भोजन प्रसाद, स्वाहाकार सारखे धार्मिक विधी आदीसाठी करण्यात येत आहे.

  ✻✻✻ दानपेटीमधील लखोटाबंद देणगीरक्कम संपूर्ण नाव, गांव, पूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक आदी तपशील नमूद करून दानपेटीत अर्पण केल्यास यथावकाश देणगी पावती अंगारा-प्रसादासह पाठवली जाईल.

  तरी देवासाठी आणि देवाकरिता अर्पण करायचे अर्पणदान, रोख रक्कम दानपेटीमध्येच अर्पण करावी. **दानपेटीच्या माध्यमातून देवस्थानचा वर्षभराचा सर्व धार्मिक खर्च करण्याचे नियोजन केले आहे. तरी ही सूचना सर्वांनी विचारात घ्यावी.**
- श्रीदेवाला वस्तुरूप देणगी देताना देवस्थानशी संपर्क साधून दिल्यास योग्य होईल.मंदिरातील गरजा लक्षात घेऊन वस्तुरूप देणगी दिली जावी, अशी नम्र सूचना आहे.
- देवस्थान संबंधातील अनेक तऱ्हेची माहिती/फोटो व्हिडीओ व सर्व काही "Anjaneshwar Devastan" या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात येते. तरी आपणही या फेसबुक पेजला आवर्जून भेट द्यावी. तसेच **"श्री देव अंजनेश्वर देवस्थान"** व्हाटस अप चॅनेलच्या संपर्कात रहावे. त्याचप्रमाणे "www.shridevanjaneshwar.com" या वेबसाईटवर सर्व माहिती उपलब्ध आहे.

सर्वांसी नमस्कार.

# दोन शब्द ...

प्रतिवर्षाप्रमाणे आजरोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सन २०२४/२५ सालचा वार्षिक अहवाल श्रीदेव अंजनेश्वर महाराजांच्या आज्ञेने प्रसिध्द करीत आहे. वर्षभरातील जमाखर्चाचे आर्थिक कामकाज, धार्मिक कार्यक्रम, वर्षभरातील कडूगोड प्रसंग याचे सर्वसाधारण समालोचन लेखी स्वरूपात या अहवालाचे माध्यमातून मी आपल्यापर्यंत पोहोचते करीत आहे. सारे सारे लेखन श्रीदेवाला साक्ष ठेवून केले आहे. हा वार्षिक अहवाल वाचून आपण आपले अभिप्राय, आपल्या सूचना अवश्य पाठवाव्यात. फेसबुक, व्हाटस अप, आणि शक्य तिथे हस्तदेय पध्दतीने हा 'वार्षिक अहवाल' आपल्यापर्यंत पोहोचवून वर्षभरातील एकूण कारोभाराचा लेखाजोखा आपल्यापुढे सादर केला आहे. कुणी मागणी केलीच तर हा वार्षिक अहवाल पोस्टाने त्या त्या मागणीदाराच्या पत्त्यावर पाठवता येईल. असो. आपणही हा श्रीदेव अंजनेश्वरच्या कारभाराचा अहवाल आपल्या मित्रपरिवार,नातेवाईक आणि संपर्कातील सर्वांना पाठवावा, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे..

कै.सदाशिव लक्ष्मण तथा बाबुराव देसाई आणि कै.गणेश बाळकृष्ण तथा आबा देसाई या दोन महानुभावांनी धर्मादाय दप्तरी रजिस्टर केलेला श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा १००% धार्मिक ट्रस्ट दि.१७ नोव्हेंबर २०२७ मध्ये ७५ वर्षांचा होणार आहे.वर्ष २०२७ हे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. तसेच हा ट्रस्ट माझ्या एकमात्र सही शिक्याने आयकर विभागाकडे नोंदणीकृत होऊन या ट्रस्टसाठी आयकर नोंदणी नं. AARTS7339F22PN01 /दि.२८.०२.२०२३ असा क्रमांक मिळालेला आहे व 12Aचे आयकर कपातीचे सर्टिफिकेट मिळालेले आहे. तसेच सरकारी अनुदान आणि परदेशी देणगी स्वीकारण्यासाठी अडचण येऊ नये, सुलभता यावी म्हणून नीती आयोगकडील दर्पण पोर्टल वर दर्पण नोंदणी नं. MH/2025/0720285 / दि.१०.०७.२०२५ नुसार नोंदणी केली आहे. तसेच आयकर खात्याकडे टॅन नोंदणी नं. KLPS16433E / दि.०९.०५.२०२४ मिळाला आहे.

मित्रहो, सन २००७ पासून सातत्याने अहवाल छपाई करून देवस्थानबाबतची इत्यंभूत माहिती माहिती मी आपल्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. आजवरचे सर्व अहवाल सहजपणे पाहता यावे म्हणून सर्व अहवालांसाठी क्यूआरकोड तयार केला आहे. अंजनेश्वर फेसबुक पेज कधीही वाचता यावे, त्यामधील अपलोड व्हीडीओ, फोटो पहाता यावे म्हणून त्यासाठी क्यूआरकोड तयार केला आहे. अंजनेश्वर युट्यूब वरील व्हिडिओ क्लिप पहाण्यासाठी स्वतंत्र क्यूआर कोड तयार केला आहे. अंजनेश्वर वेबसाईटसुद्धा क्यूआरकोड स्कॅन करून सहजपणे पहाता येत आहे. अंजनेश्वर बँक खात्याचा क्यूआरकोड वापरून देणगी पाठवणे सुलभ केले आहे. उद्देश इतकाच की सर्व सर्व आपल्यापर्यंत थेटपणे, सुलभपणे आणि सहजपणे पोहोचावे. देवस्थानचा एकूण कारोभार उघडा उघडा रहावा हा त्यामागील हेतू आहे. कोणतीही माहिती लपवून ठेवण्याची ना मला आवश्यकता आहे ना तशी गरज आहे. ट्रस्ट कारभाराबाबत विश्वास तयार व्हावा हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

मित्रानो, दानपेटीच्या माध्यमातून मंदिराचे एकूण आर्थिक कामकाज चालावे, अशी माझी वैयक्तिक अपेक्षा आहे. वर्षभरातील उत्सव, धार्मिक कामकाज, कीर्तनादी सर्व कार्यक्रम दानपेटीतील जमा रकमेतून चालावेत, यासाठी दानपेटीबाबत मी विशेष आग्रही राहिलो आहे. गुप्तदेणगी, निनावीदान देण्याची सुविधा या ट्रस्टमध्ये यापूर्वी उपलब्ध नव्हती. ती सुविधा दानपेटीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे. अंजनेश्वर, मुहूर्ताई व भराडणी या तीनही मंदिरामध्ये दानपेट्या बसविल्यामुळे कुणाही भाविक भक्ताला एक रुपया पासूनचे अर्पणदान, गुप्तदान अथवा देणगी रक्कम दानपेटीतून श्रीदेवासाठी देणे अगदी सोयीचे आणि सुलभ झाले आहे. अंजनेश्वर मंदिरात दानपेट्या बसविणे, हे दिसते इतके सुलभ नव्हतेच. दानपेट्या बसवून त्यामधील जमा रक्कमेचे हिशोब ठेवणे, हे सुद्धा एक जबाबदारीचे काम होते. गुप्तदान ,निनावी देणगी देवस्थानच्या जमाखर्चात तपशीलवार नोंदणे हे त्याहून जबाबदारीचे कामकाज होते.तसेच पूजारी वर्गाचा पराकोटीचा विरोध/आक्रोश मी स्वतः सहन केला आहे. राजापूर अर्बन बँकेच्या मनस्वी सहकार्यामुळे या दानपेटीतील जमा दानाचे मोजमाप त्यांचे मार्फत वेळोवेळी हाऊन जमा रक्कम थेटपणे बँकेत परस्पर भरणा होते. त्यामुळे शंकाशक्यतेला जागा रहात नाही. वेळोवेळी दानपेटीमधील जमारक्कमे बाबतचे प्रसिद्धीपत्रक काढले जाते. ते प्रसिद्धीपत्रक अंजनेश्वर फेसबुक पेज, अंजनेश्वर व्हाटस अप चॅनेलवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येत आहे. भक्ताने देवासाठी अर्पण केलेले अर्पणदान हिशोबात आले पाहिजे, त्याचे ऑडीट अकाऊंटींग झाले पाहिजे. देवासमोरील देवासाठी देवाकरिता ठेवलेले अर्पणदान हिशोबात आणणे या करिता दानपेटीचा उद्देश आहे. त्यासाठीचा केलेला प्रयत्न यशस्वी होताना दिसत

आहे. दानपेटी मधून मिळणारी रक्कम देवस्थान मधील धार्मिक कार्यासाठी आणि देवस्थान मधील सोयीसुविधांसाठी खर्च होत आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की देवासमोर ठेवायचा एक एक रूपया, चलनी नोटा, चलनी नाणी प्रत्येक भाविक भक्ताने दानपेटीमध्येच अर्पण केली पाहिजेत. दानपेट्या काढून टाकण्याची तक्रार येथील सहा लिंगायत पुजाऱ्यांनी केलेली आहे व त्याबाबत चौकशी अंती अंतिम निर्णय प्रक्रिया धर्मादाय खात्याकडून निश्चितच केली जाईल. थोडक्यात दानपेटी बसवून पुजारी वर्गाचा माझेवरील वैयक्तिक रोष मला निमुटपणे सहन करावा लागत आहे. ही बाब येथे सर्वांना समजली पाहिजे म्हणून विशेष करून मांडली आहे.

मित्रांनो, श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानची सुमारे ४५ हेक्टर (११२ एकर) जमीन लागवडीखाली आणण्यासाठी संरक्षक भिंत तथा कंपाऊंड वॉल घालण्याचे कामकाज प्रगतीपथावर आहे. चाफास्टॉप पासून जांभादगडाची संरक्षक भिंत घालण्याचे कामकाज सुरू आहे. चाफास्टॉप जवळ आरसीसी प्रवेशद्वार बांधून दोन्ही बाजूला जांभा दगडाची संरक्षकभिंत बांधकाम झाल्यामुळे भविष्यात कलम, काजू , नारळ, सुपारी आदींची लागवड करणे शक्य होईल. अर्थात हे सर्व दिसते इतके सुलभ-सहज नसले तरी ते सुलभ आणि सहज करण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रयत्न करणे आपल्या हाती आहे. यशस्वी होणे अंजनेश्वरचे हाती आहे. सुमारे ४०/४५ हेक्टर जमीनक्षेत्र लागवडीखाली आणणे, हे एक प्रकारचे आव्हान आहे. मानवी सहकार्य व परमेश्वरी साथ मिळाली तर सर्व काही शक्य होईल. अशक्य असे काहीच नाही, असे मला वाटते.

देवासाठी चांदीची पालखी, चांदीचे सिंहासन आणि चांदीची प्रभावळ हे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. एकूण ५१ किलो ६५ ग्रॅम चे चांदीकाम झाले आहे. गोखले सराफ, कोल्हापूर यांनी हे सर्व काम जबाबदारीने आणि आपुलकीने करवून घेतले म्हणून त्यांचे आभार मानले पाहिजेत. कोल्हापूरच्या न्यू एम आय डी सी मधील 'सील्व्हर झोन' (हुपरी) मध्ये हे सर्व चांदीकाम झाले म्हणून तेथील कारागीरांचे आभार मानलेच पाहिजेत.. सध्याचे चांदीचे दर लक्षात घेता हे चांदीच्या पालखी सिंहासनाचे एकूण कामकाज देवस्थानच्या दृष्टीने फायदेशीर ठरले आहे. मंदिरावरचा सुवर्णकळस जसा सोने दरवाढीमुळे भरपूर फायदेशीर ठरला तसेच हे चांदीकाम फायदेशीर ठरले आहे.

मंदिराच्या मागील भक्तधाम इमारतीचे कामकाज याच आर्थिक वर्षात पूर्ण झाले आहे. वेस्टर्न टॉयलेटसह आवश्यक गरजा या वास्तू मध्ये पूर्ण झाल्या आहेत. अगदी नियत वेळेमध्ये ही वास्तू पूर्ण झाली आणि त्या वास्तूचा वापर भाविक भक्तांसाठी हाऊ लागला आहे. हे भक्तधाम देवस्थान स्वनिधीतून झाले आहे. श्री. अनिल विनायक काळे यांच्या रु. पाच लाखांच्या देणगी मुळे या कामाला गती मिळाली हे इथे विशेषपणे नमूद केले पाहिजे.

सन २०२७ पर्यंत अंजनेश्वर देवस्थानसाठी व्यवस्थापक मंडळ गठीत करून सर्व कारोभार त्यामार्फत करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. खोत, सेवेकरी, मानकरी, देणगीदार आदी लोकांनी व्यवस्थापक मंडळ करण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेतला पाहिजे. एक दोन वर्ष व्यवस्थापन मंडळाने देवस्थानचा कारभार चांगल्या पद्धतीने चालवला की या ट्रस्ट साठी नवीन स्कीम बनवणे शक्य होईल. या करिता एक जनरल सभा नुकतीच घेण्यात आली आणि त्यामध्ये १३/१४ जणांचा सहभाग असलेले व्यवस्थापक मंडळ गठीत केले आहे. उत्सव व्यवस्थापन, दैनंदिन व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन आदी अनेक कामे या व्यवस्थापन मंडळाच्या सहकार्याने व सहयोगाने करणे शक्य झाले आहे.

मित्रहो ..महाशिवरात्री उत्सव २०२५ चा पोलीस बंदोबस्त घऊन करावा लागला. पोलीस बंदोबस्त फी रू. ८०२२/- तीन दिवसांच्या उत्सवासाठी देवस्थान मधून खर्ची पडलेली आहे. श्री. भिकाजी यशवंत लिंगायत या लिंगायत-पूजारीचे विरोधात दि.१७.०२.२०२५ रोजी एनसी रजिस्टर नं.२७/२०२५ द्वारे नाटे पोलीस स्टेशन मध्ये जाऊन एनसीआर फाईल करावा लागला. ही कारवाई अप्रिय असली तरी उत्सवाचे नियोजन नीटपणे होण्यासाठी मला करावी लागली आहे. कार्तिक उत्सव २०२४ मध्ये पालखी समोरची दानपेटी याच लिंगायत पुजाऱ्याने उचलून बाजूला नेऊन ठेवली म्हणून पोलीस स्टेशनला त्या बाबत लेखी तक्रार करावी लागली आहे. तसेच श्रीमती अश्विनी अनंत लिंगायत या एका लिंगायत-पूजारी महिलेने चुकीचे सातबारा उतारे जोडून पोलीस स्टेशनला दि.१९.१०.२०२३ च्या तारखेच्या तक्रार अर्जाने तक्रार करून भक्तधामचे बांधकाम बंद पडण्याचा प्रयत्न केला. अर्थात पोलीसांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यावर वस्तुस्थिती समोर आली. पोलीस स्टेशन, गाव पोलीस पाटील यांनी तोंडी, लेखी समज या आसामींना दिली आहेच...मित्रहो..ही अशी ठराविक २/३ माणसे सातत्त्याने जाणीवपूर्वक विरोधी कामकाज करतात, अप्रसिद्धी करतात तेव्हा नाईलाजाने त्यांचे विरुद्ध कारवाईचे कामकाज करावे लागते. त्यामुळे सर्व लिंगायतपुजाऱ्यांनी याबाबत योग्य ती समज अशा लोकांना देण्याची गरज आहे. तसेच देवस्थानच्या अन्य संबंधितांनी यामध्ये केवळ बघ्याची भूमिका घेणे देवस्थान हिताचे होणार नाही. त्यांनीही

पुढाकार घेऊन अशा लोकांना आवर घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एक अकेला थक जाएगा, साथी हाथ बटाना हे असे झाले पाहिजे.. श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा पब्लिक ट्रस्ट आपण मानत असू तर या ट्रस्टच्या संबंधातील सर्वांचे हे कर्तव्य आहे की ट्रस्टला बाधा पोहोचवणाऱ्या लोकांचा सर्वांनी एकत्र येऊन बंदोबस्त केला पाहिजे. श्री.भिकाजी यशवंत लिंगायत यांनी देवाच्या पिंडीवरील वज्रलेपनास अकारण विरोध करून समाजमन कलुशीत केल्यामुळे वज्रलेपनाचे कामकाज मला पुढे अमंलबजावणीत आणता आले नाही. अगदी अलिकडे म्हणजे श्रावण सोमवार दिनांक २८ जुलै२५ रोजी श्री. भिकाजी यशवंत लिंगायत यांनी पुन्हा एकदा आरतीला येणाऱ्या लोकांना वेठीस धरून देवाच्या सभामंडपात आपल्या व्यथा ऐकवल्या.यामध्ये उपस्थित असलेल्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली परिणामी गाव पोलीस पाटील यांच्या करवी यांना लेखी समज द्यावी लागली. अहवालामध्ये ही बाब अधोरेखित करून सांगीतली आहे. जेणेकरून अशा लोकांनी सुधारणा करावी किंवा अन्य लोकांनी अशांना सुधारणा करण्यासाठी सुधारणा प्रयत्न करावेत..

मित्रांनो.. धर्मादाय कायद्याला आणि आयकर कायद्याला अपेक्षित असलेले ट्रस्टीपणाचे कर्तव्य आपल्याकडून पालन होण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करतो आहे. मित्रहो.. या ट्रस्ट मध्ये धर्मादाय आयुक्त यांच्या दि.१७.११.१९५२ रोजीच्या आदेशानुसार जो मंदिर व्यवस्थापनाचा परिपाठ धर्मादाय दप्तरी नोंद झाला आहे त्याचे पालन होणे हे बंधनकारक "Besides There is family of guravs which maneges religious affairs of the temple and holds some Devastan lands in trust for the purpose hereditary." आहे. मित्रहो.. गुरवांच्या कुटुंबियांनी मंदिराचे धार्मिक कामकाज करायचे आणि त्या कारणासाठी देवस्थानच्या काही जमिनी ताब्यात ठेवायच्या इतकेच मर्यादित अधिकार (Respective sphere) गुरव कुटुंबीयांना दिलेले आहेत. थोडक्यात जमिनीच्या उत्पन्नाचे बदल्यात मंदिराच्या धार्मिक कामकाजाची जबाबदारी गुरव कुटुंबीयांना धर्मादाय आयुक्त यांनी दिली आहे. जमीन उत्पन्नाचे बदल्यात, शेती उत्पन्नाचे बदल्यात मंदिराचे धार्मिक कामकाज म्हणजे नित्य पूजा नैवेद्य झाडलोट आदी कामे करायची आहेत. या मध्ये उत्पन्न म्हणजे स्थावर मालमत्तेमधील, उत्पन्न, शेती उत्पन्न होय. जंगममालमत्ता म्हणजे movable property म्हणजे पैसा नाणी, नोटा, सोने, चांदी आदी सर्व चलसंपत्ती.. देवस्थानची जंगम मालमत्ता वार्षिक उत्सवासाठी ताब्यात ठेवायची जबाबदारी देसाई कुटुंबाकडे दिलेली आहे.. "The family of Desai looks to the general affairs of the Temple and holds certain movable property of the deity in trust for performing annual festivals at the shrine." मित्रहो, movable property म्हणजे चल संपत्ती,जंगम मालमत्ता..थोडक्यात नाणी,नोटा,सोने, चांदी आदी सर्व संपत्ती देवाचे वार्षिक उत्सव पार पाडण्यासाठी हे नाणी, नोटा सोने चांदी आदी सर्व चलसंपत्ती ताब्यात ठेवायच्या अधिकारीता देसाई कुटुंबाकडे दिलेल्या आहेत..देवाची चलसंपत्ती ताब्यात ठेवण्याचे अधिकार गुरव कुटुंबीयांना दिलेले नाहीत. हे धर्मादाय आदेशातील मंदिर व्यवस्थापनाच्या कार्यकक्षा लक्षात घेऊन कामकाज होणे कायद्याला अपेक्षित आहे..गुरव कुटुंबीयांना प्रत्यक्ष लाभार्थी (direct beneficiary) ही अधिकारीता दिलेली असली तरी ती शेती उत्पन्नाचे पुरती ,स्थावर मालमत्तेमधील उत्पन्नापुरती मर्यादित आहे हे लक्षात घेऊन कामकाज केले पाहिजे.जोपर्यंत दि.१७.११.१९५२ रोजीचे मे.धर्मादाय आयुक्तांचे आदेश बदलत नाहीत तोपर्यंत त्या आदेशानुसार आणि त्या आदेशामधील विश्वस्त कार्यकक्षा लक्षात घेऊन कामकाज होणे बंधनकारक आहे.. गुरवपुजाऱ्यांनी दानपेट्यांना विरोध करणे ही बाब धर्मादाय आयुक्तांच्या आदेशाचा अवमान आहे. देवाच्या पुढ्यातील नाणी, नोटा, सोने, चांदी आदी चलसंपत्ती (movable property) देवाच्या वार्षिक उत्सवांसाठी ताब्यात ठेवायची अधिकारिता देसाई कुटुंबाकडे आहे, गुरव कुटुंबियांना असे अधिकार दिलेले नाहीत. पब्लिक ट्रस्ट असल्यामुळे स्थावर उत्पन्नाचे आणि जंगम उत्पन्नाचे हिशोब ठेवणे अनिवार्य आहे ही बाब गुरव कुटुंबियांनी, त्यांचे दोन्ही ट्रस्टीं नी लक्षात घेतली पाहिजे.. आडमुठे धोरण कायद्याच्या चौकटीत बसणारे नाही आणि त्याचे समर्थन कदापि शक्य नाही.. मित्रहो.. धर्मादाय आयुक्त यांनी आखून दिलेले व्यवस्थापनपत्र शिरसावंद्य मानून कामकाज झाले पाहिजे.. सर्व लक्षात घेऊन देवस्थानचे कामकाज होणे देवस्थानच्या समग्र हिताचे निर्णय घेताना अकारण गैरसमज होत असतात. निस्वार्थ भावनेतून कामकाज करताना अकारण विरोध झाला, गैरसमज तयार झाले की दैनंदिन कामकाज करताना अडचणी येतात. सर्व शंकाशक्यता लक्षात घेऊन कामकाज करावे लागते. या देवस्थान ट्रस्ट साठी जनरल बॉडी आणि मॅनेजींग बॉडी (व्यवस्थापकमंडळ) गठीत व्हावी, असे मला आजकाल मनापासून वाटू लागले आहे. देवस्थानची खोतमंडळी, सेवेकरीमंडळी, मानकरीमंडळी, देणगीदार आदी सर्व हितसंबंधींची जनरल बॉडी आणि त्यामधून सर्व सहमतीने प्रत्येक तीन वर्ष कालावधीसाठी मॅनेजींग बॉडी तथा व्यवस्थापक मंडळ गठीत झाले तर देवस्थानचा कारोबार

एकतर्फा होणार नाही. बहूतर्फा, बहूमताचा आणि बहूआयामी कारभार होण्यासाठी व्यवस्थापक मंडळ अधिकारावर आणण्याची गरज भासू लागली आहे.. सन २०२७ पर्यंत जनरल बॉडी आणि मॅनेजींग बॉडी तयार करून कारभार नीटपणे हाकला गेला तर २०२७ नंतर धर्मादाय खात्याकडे स्कीम तयार करून या नवीन उपक्रमाला मान्यता घेता येईल. देवस्थान हितसंबंधीत सर्वांनी या बाबत पुढाकार घेतला पाहिजे. सन २००८ ते सन २०२५ पर्यंत कामकाज करताना मी देवस्थानचे ट्रस्टइंस्ट्रूमेंट (व्यवस्थापनपत्र) शिरसावंद्य मानून आणि धर्मादाय कायदा अन् आयकर कायदा यामधील मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन कारभार करत आहे.

निंदकाचे घर असावे शेजारी ।
येताति बाहेर गुण दोष ।
निंदक हा माझा कंठीचा ताईत ।
त्याने सर्व हित केले माझे ।। (संत तुकाराम)

कामकाज करताना थोडीफार निंदा होणे आवश्यक आणि गरजेचे असते. निंदक जेवढी निंदा करतील तेवढी ती हिताची होते. निंदा झाली नाही तर कामकाज करण्यात सजगता येत नाही. निंदा झाली तरच कामकाज काटेकोरपणे होते. त्यामुळे सार्वजनिक कामकाज होत असताना निंदक हे सर्वथा वंदनीय आणि मार्गदर्शक समजावेत.

अंजनेश्वर ट्रस्टचा कारभार यापेक्षाही अधिक गतीमान चालावा, अशी मनापासून अपेक्षा आहे. नवनवीन लोकांनी या देवस्थानच्या दैनंदिन कामकाजामध्ये, सोयीसुधारणांमध्ये, उत्सवकामकाजामध्ये प्रत्यक्ष सहभाग घ्यावा, असे आवाहन या वार्षिक अहवालाचे निमित्ताने मी करत आहे. अंजनेश्वर देवस्थानचा नावलौकिक उंचावण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी एकत्रितपणे केला पाहिजे. तसे शक्य झाले नाही तर समर्थ रामदास म्हणतात तसे..

''हुंब्यास हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ।। २९।।
धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ।। ३०।।
जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ।
इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ।। ३१ ।।

मित्रहो, असेच काहिसे करावे लागेल. सन २०२७ मधील अमृतमहोत्सवी वर्ष थाटामाटात साजरे करण्यासाठी आपण सर्वांनी कटिबद्ध झाले पाहिजे. परमेश्वर आपणासर्वांना उत्तम आरोग्य आणि सुबुद्धी देवो अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे हे लांबलेले दोन शब्द येथेच पूर्ण करतो.

आपला नम्र,
**डॉ. मिलिंद देसाई**
विश्वस्त,
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
संपर्कासाठी मोबा. ९८२३२७७३२६ (whatsapp)
ई–मेलआयडी–shridevanjaneshwar@gmail.com.

# वर्षभराचे सर्वसामान्य 'इतिवृत्त.'..

● **श्री देवासाठी चांदीचे सिंहासन, चांदीची पालखी आणि चांदीची प्रभावळ .....** अंजनेश्वर महाराजांची चांदीची पालखी, चांदीचे सिंहासन आणि चांदीची प्रभावळ हे एक स्वप्न पूर्ण झाले. गुरूवार दि.२४ ऑक्टोबर २०२४ रोजीचा गुरूपुष्यामृत योगाचा दिवस त्यासाठी सत्कारणी लागला. निवडणूक आचारसंहितेचा कालावधी असतानाही कोणतीही अडचण, बाधा ही सर्व वहातुक कोल्हापूरहून होत असताना आली नाही. अंजनेश्वर दरबारी सर्व सुखरूप पोहोचले. सर्व 'अंजनेश्वर कृपा' म्हणायची.. चांदीचे दर प्रतिकिलो एक लाखाचे पार जाणार हे लक्षात आल्यामुळे थोडी घाईगडबड करून आणि आर्थिक जुळवाजुळव करून तीनही वस्तूंच्या घडावटीचे कामकाज पूर्ण करून घेतले आहे.. यासाठीची देणगी यापुढेही स्वीकारण्यात येणार आहे.. एकूण ५१ किलो ६५ ग्रॅम चे चांदीकाम झाले आहे..गोखले सराफ, कोल्हापूर यांनी हे सर्व काम जबाबदारीने आणि आपुलकीने करवून घेतले म्हणून त्यांचे आभार मानले पाहिजेत. कोल्हापूरच्या न्यू एम आय डी सी मधील 'सिल्व्हर झोन'(हुपरी) मध्ये हे सर्व चांदीकाम झाले म्हणून तेथील कारागिरांचे आभार मानलेच पाहिजेत. शिसवी लाकडावर हे चांदीकाम झाले आहे..येथील सुतारमंडळींच्या लाकुडकामावर हा चांदीसाज चढवलेला आहे. कोल्हापूर ते मिठगवाणे ही वहातुक श्री. रोहीत रमेश काजवे यांच्या बोलेरो टेम्पो मधून झाली. रस्त्याची बिकट अवस्था लक्षात घेता ८/१० गाद्या घालून हे सर्व आणावे लागले. श्री.नरेश विठ्ठल कांबळी, श्री. सुनील काजवे, श्री. अमोल कांबळी, श्री.प्रमोद उपळकर आणि श्री. गिरीश धनावडे हे सर्व सोबत होते. हे सर्व जोखीमेचे वाटत होते परंतू सर्व जोखीमीचा भार स्वत: श्रीदेवाने उचलल्यामुळे आमच्यावर कोणतेच ओझे राहिले नाही. सध्या चांदीचे दर सुमारे सव्वा लाखांच्या पुढे गेल्याने हे पालखी सिहासन आणि प्रभावळीचे चांदीकाम श्रीदेवासाठी फायदेशीर ठरले आहे.

● **सुसज्ज भक्तधाम..** सोमवार ४ सप्टेंबर २०२३ रोजी प्रातिनिधीक भूमिपूजन समारंभ झालेले चार खोल्यांचे भक्तधाम निवासी व्यवस्थेसाठी दि.१२ नोव्हेंबर २०२४ पासून उपलब्ध झाले आहे. देवस्थान स्वनिधीतून ही भक्त धाम वास्तू पूर्णत्वास गेली आहे. या भक्तधाम मध्ये कमोड शौचालय, बाथरूम, इलेक्ट्रिक गिझर, आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. भक्तधामच्या खाली कलामंच सुद्धा देखणा झाला आहे. सुमारे ४५/४६ लाखांचा अंदाजित खर्चाचे हे भक्तधामाचे काम मंदिर परिसराची शोभा वाढवणारे झाले आहे.

● **कंपाऊंड वॉल..** अंजनेश्वर जमिनीला कंपाऊंड वॉल घालण्याचे ५०% काम जवळपास पूर्ण झाले आहे. चाफा स्टॉप कडील बाजूने कंपाऊंड वॉलचे काम बहुतांशी पूर्ण होत आले आहे. अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टच्या नावाने असलेल्या खाते क्रमांक २१५६ मध्ये एकूण ४५ हेक्टर जमीन क्षेत्र आहे. यासाठी कंपाऊंड वॉल घालणे हे कामकाज टप्याने पूर्ण करावे लागणार आहे. अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टच्या जमिनीला कंपाऊंड वॉल घालण्याचे काम सोमवार दि.०३ जून २०२४ रोजी पासून सुरू करण्यात आले. सुमारे ४५ हेक्टर जमीनक्षेत्राला कंपाऊंड वॉल घालायचे कामकाज हाती घेण्यात आले आहे. साडेचार फूट उंचीचे जांभा चिऱ्याचे कंपाऊंड घालण्याचे काम सुरू आहे. चिरे, रेती, सिमेंट, मजुरी, वहातूक आदी लक्षात घेतले तर एक चिरा कंपाऊंड वॉल मध्ये बसतो तेव्हा तो सामान्यपणे रू. ७५/८० रूपये खर्च करतो. अंजनेश्वर जमीन जागा कंपाऊंड वॉल मध्ये बंदिस्त झाली तर पुढेमागे फळबाग लागवड शक्य होईल. नारळ, सुपारी, काजू, आंबे यासह फूलशेती आदी सर्व काही शक्य आहे. धाडसाने हे काम हाती घेतले आहे. श्री.नरेश कांबळी, श्री. रामदास रायकर, श्री. अनंत गडगेकर , श्री.प्रमोद शिंदे, श्री. सदानंद लिंगायत, श्रीम.विमल धनावडे, सौ. रायकर आदीनी यामध्ये बांधकामात सहभाग घेतला म्हणून उल्लेख केला आहे.

● **भराडणी मंदिरामध्ये सोलर सिस्टीम..** आज दि.२८फेब्रुवारी २५ रोजी श्री देवी भराडणी मंदिरामध्ये 3KW ची सोलर सिस्टीम बसविण्यात आली. पीएम सूर्या योजनेतून ही सोलर सिस्टीम बसविली आहे. विजेच्या बाबतीत श्रीदेवी भराडणी स्वयंपूर्ण झाली आहे. यामध्ये श्री. अभय भुस्कुटे, पुणे यांचे मार्फत पॉवरक्राफ्ट इलेक्ट्रोनिक्स प्रायव्हेट लिमिटेड पुणे चा सोलर संच बसवण्यात आला आहे. तसेच फिटिंगसाठी श्री. विशाल राजापकर आणि श्री. पावसकर यांची साथ मिळाली. श्री. सय्यद हसोळकर मिर यांनी त्यासाठी लागणारे फॅब्रीकेशन वर्क अगदी जलदगतीने करून दिले. श्री. नरेश विठ्ठल कांबळी, श्री. बबन गडगेकर, श्री पांडुरंग तांबे, कु. यश तांबे, श्री. विलास मेस्त्री, श्री. मोहन मेस्त्री, श्री. भूषण जैतापकर श्री. राजा लिंगायत, श्री. रामदास रायकर, श्री. प्रमोद उपळकर, श्री. प्रकाश उपळकर, श्री. मणचेकर आदी सर्वांचे सहकार्य मिळाले. ऑनग्रीड सोलर सीस्टीम आहे. रू. ७८ हजारची सबसीडी शासनाने अंजनेश्वर बँक खात्यात जमा केली आहे. यामध्ये श्री. अभय पद्माकर भुस्कुटे यांनी शासन सबसिडी मिळेपर्यंत सातत्त्याने पाठपुरावा केला म्हणून सबसिडीची रक्कम जमा झाली. यामुळे त्यांचा उल्लेख येथे प्रामुख्याने केला आहे.

● **भराडणीमध्ये अर्पणपेटी..** कार्तिक कृष्ण द्वितीया शके १९४६ रविवार दि.१७ नोव्हेंबर २०२४ रोजी श्री देवी भराडणी मंदिरामध्ये एक अभिनव अर्पणपेटी बसवण्यात आली आहे. देवीसाठी अर्पण केलेली साडी, नारळ, खण हे सर्व अर्पण साहित्य बंदिस्त करून ठेवायची सोय झाली आहे. यामुळे भाविक भक्तांनी अर्पण केलेल्या साडी, नारळ, खण आदी साहित्य एकत्रितपणे जमा होते आणि या अर्पण साहित्याची विक्री करून मिळणारी रक्कम श्रीदेवीच्या दानपेटीत वेळोवेळी जमा होते. थोडक्यात भक्ताने अर्पण केलेले सर्वच्या सर्व वस्तू हिशोबात येतात आणि त्यांच्या विक्रीतून जमा होणारी रक्कम धार्मिक कार्यात वापरली जाते.

● **इन्व्हर्टर देखभाल दुरुस्ती..** अंजनेश्वर मंदिरातील दोन इंन्व्हर्टर व मुहूर्ताई मंदिरातील इंन्व्हर्टरची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती होते. श्री. पंकज सुर्वे (कै. राजाभाऊ भागवतांचे नातू) हे वेळोवेळी माफक दरात देखभाल दुरुस्ती करतात. नवीन बॅटऱ्या घालून दुरूस्ती करण्यात आली आहे. हे देखभाल दुरुस्तीचे कामकाज दिवसेंदिवस खर्चिक होत आहे.

● **नवरात्र उत्सव २०२४ –** गुरूवार दि. ०३ ऑक्टोबर २०२४ ते दि.१२ ऑक्टोबर २०२४ असा नवरात्र उत्सव श्रीदेवी मुहूर्ताई व श्रीदेवी भराडणी मंदिरात संपन्न झाला. दोन्ही मंदिरात भाविक भक्तांची लक्षणीय उपस्थिती होती. मुहुर्ताई मंदिरात रोजची सुमारे २००/२५० भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती. रोज काही ना काही प्रसाद वाटप होत होते. श्रीदेवी भराडणी मंदिरात सुद्धा ५०/६० भाविकांची उपस्थिती होती. आठव्या माळेला श्रीदेवी भराडणीला मुखवटा लावन नटविले होते. दसऱ्याचा सोने लुटण्याचा कार्यक्रम प्रतिवर्षा प्रमाणे आनंदात व उत्साहात पार पडला.

● **काकडारती २०२४..** गुरुवार दि. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी नरक चतुर्दशी दिवशी सकाळी ५.०० वाजता काकडारतीचा कार्यक्रम संपन्न झाला . २५०–३०० च्या दर्म्यान एकूण भक्त वर्गाची उपस्थिती होती. सन १९९६/९७ पासूनचा हा उपक्रम आहे. २८ /२९ वर्षांचा उपक्रम प्रतिवर्षी काही ना काही वाढते रूप घेऊन साजरा होत आहे. सर्वांच्या हातावर दिवाळी निमित्त बुंदीलाडू आणि सोबत कडकडीत चहा देण्यात आला. दोन मिनिटांचा नामजप, नेहमीच्या ठरलेल्या आरती, प्रवचन वाचन असा प्रतिवर्षीचा कार्यक्रम पार पडला.

● **कार्तिकी उत्सवाची जनरलसभा ...** कार्तिकोत्सवासाठीची जनरल सभा सोमवार दि.०४ ऑक्टोबर २०२४ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता घेण्यात आली. खोत, सेवेकरी, मानकरी अशांची एकूण ५५ उपस्थिती होती. सन २००८ पासून कार्तिकोत्सव व शिवरात्र उत्सवाचे पूर्वी नियमितपणे जनरल सभा घेण्यात येते. या जनरल सभेमध्ये सर्वांचे स्वागत करून देवस्थान ट्रस्टसाठी पुढील तीनवर्ष कालावधीमध्ये व्यवस्थापकमंडळ स्थापन करणे आणि त्यानंतर ते व्यवस्थापकमंडळ ट्रस्टच्या पीटीआरवर नोंदणे, सन १९५२ सालामधील व्यवस्थापनपत्रात बदल घडवून नवीन स्कीम तयार करणे आणि त्यानुसार सन १९२७ नंतर देवस्थान ट्रस्टचा कारोभार चालवणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. माझ्या एकट्याच्या सहीशिक्क्याने कामकाज करण्याचे दिवस आत्ता राहिलेले नाहीत, त्यामुळे व्यवस्थापन मंडळामार्फत कारोभार करण्याबाबत तयारी करणे आवश्यक असल्याचे विस्ताराने सांगण्यात आले..ऑडीट, टॅक्स ऑडीट, टिडीएस रिटर्न आदीबाबत विस्ताराने माहिती देण्यात आली. चांदीची पालखी, चांदीचे सिंहासन आणि चांदीची प्रभावळ याबाबतचा हिशोब सांगणेत आला. ५१ किलो ६५ ग्रॅम चांदीमध्ये घडवलेल्या या तीन वस्तूंबाबत एकूण खर्चाचा तपशील सांगण्यात आला. तसेच नवीन धर्मशाळा इमारतीबाबत झालेला खर्च सांगण्यात आला. पाच दिवसीय उत्सवाची रूपरेषा सांगण्यात आली. तुळशीविवाह, लघुरूद्र स्वाहाकार, जत्राव्यवस्था, भोजनप्रसाद, कॅश काऊंटर, ध्वनीव्यवस्था, रोषणाई आदीबाबत विस्ताराने माहिती देण्यात आली. या उत्सवामधून व्यवस्थापक मंडळ तयार होण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरवले आहे असे सांगितले. सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले. बुंदीलाडू आणि चहा देऊन सभा समाप्त झाल्याचे घोषित करण्यात आले. सन १९५२ सालातील व्यवस्थापनपत्रामध्ये बदल घडवण्यासाठी सन २०२४ ते २०२७ असा तीन वर्षांचा कालावधी मिळणार आहे. त्यामध्ये व्यवस्थापनमंडळ गठीत होणे आणि या व्यवस्थापनमंडळाने तीन वर्ष कालावधीत कामकाज करणे अपेक्षित आहे. कारोभार नीटपणे झाला की ते मंडळ कायदेशीररीत्या अधिकारावर येण्याची प्रक्रिया करता येईल आणि १९५२ सालातील व्यवस्थापनपत्रामध्ये कायदेशीर बदल घडवता येतील. 'वंशवार विश्वस्त व्यवस्था' बदलण्यासाठी हे सर्व केले पाहिजे आणि ते शक्य आहे. असे सर्व विस्ताराने सांगण्यात आले.

● **कार्तिकी उत्सव २०२४..** सोमवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ ते १५ नोव्हेंबर २०२४ असा पाच दिवसांचा कार्तिकी उत्सव साजरा झाला. सोमवार दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी देवस्थानचे माजी विश्वस्त श्री. नारायण हरी तथा नाना देसाई यांच्या कडून श्रीदेवाच्या चांदीच्या पालखीचे, सिंहासनाचे आणि प्रभावळीचे विधिवत पूजन करण्यात आले. पाचही दिवस ह. भ. प. श्री. श्रेयस मिलिंद बडवे, पुणे यांची कीर्तनसेवा झाली. कीर्तन साथीला साथिदार म्हणून श्री. कौस्तुभ सुधाकर परांजपे व श्री. अमेय ज्ञानेश्वर हर्डीकर हे होते. श्रीम. कविता नायर मॅडमच्या पुढाकाराने विविध ग्रह उपयोगी वस्तूंचे प्रदर्शन व विक्री महोत्सव याचे उद्घाटन उत्सवाच्या पहिल्या दिवशी पार पडले. हे प्रदर्शन पाचही दिवस चालले व त्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंगळवार दि.१२ नोव्हेंबर रोजी मंदिरात तुळशी विवाह संपन्न झाला. श्री. पंकज देसाई व सौ. पद्मजा पंकज देसाई यांनी यजमानपद भूषवले. तसेच रात्री भक्तधाम लोकार्पण कार्यक्रम पार पडला. या उत्सवातील पहिल्या दोन दिवसांचा कार्यक्रम माझ्या अनुपस्थित पार पडला. बुधवार दि.१३ नोव्हेंबर रोजी माझ्या उपस्थितीत रात्री ९.०० वाजता पालखीजवळील दानपेटी पुनश्च पालखीशेजारी आणून पोलीस पाटील आदि सर्वांच्या साक्षीने बसविण्यात आली. तसेच गुरुवार दि.१४ रोजी सकाळी पालखी जवळील दानपेटी उचलून ठेवल्याचे लक्षात आलेवर पुन्हा एकदा दानपेटी पालखी जवळ आणून बसवावी लागली. दानपेटी

दोन वेळ उचलून नेल्याबाबत नाटे पोलीस स्टेशनला पुजारी श्री. भिकाजी यशवंत लिंगायत यांचे विरुध्द तक्रार करण्याचे अप्रिय कामकाज मला करावे लागले. गुरुवार दि.१४ नोव्हेंबर रोजी लघुरुद्र स्वाहाकार समारंभ पार पडला. या करिता श्री. श्रीपाद भुस्कुटे गोवा यांनी सपत्नीक यजमान पद भूषविले. १२/१३ ब्राह्मणांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी ६००/७०० भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. रात्री श्रीदेव माणेश्वर व श्रीदेवी भराडीन पालखीच्या कार्यक्रमात उपस्थित राहिले. हा कार्यक्रम अत्यंत देखणा झाला. निवेली, करेल, चव्हाणवाडीचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी झाले होते. श्री माणेश्वर भेटीचा हा सोहळा कार्यक्रम लक्षात राहील असा झाला. शुक्रवार दि.१५ नोव्हेंबर रोजी बलिपूजन कार्यक्रम पार पडला. श्री. उदय विष्णू भोगले देसाई यांनी या बलिपूजन कार्यक्रमाचे यजमानपद भूषवले. देवाला नैवेद्य दाखवून झालेवर सुमारे तीन-साडेतीन हजारच्या आसपास भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि हा महाप्रसादाचा कार्यक्रम दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत अगदी निर्विघ्नतेने पार पडला. रात्री त्रिपुरपूजन, लोटांगण, पालखी प्रदक्षिणा , दरबार झाडणे आदी कार्यक्रम पार पडले. उपवास सोडणाऱ्यांना गोड शिरा देण्यात आला. एकूण कार्तिकोत्सव यथायोग्य पार पडला. दोन दिवसांच्या आजारपणामुळे मला उत्सवाला उपस्थित रहाणे शक्य झालेले नाही. त्या दोन दिवसात श्री. नरेश कांबळी, श्री. राजा लिंगायत आणि श्री. विलास चेऊलकर यांनी पुढाकाराने सर्व कामकाज केले हे ही विशेष नोंद घेण्यासारखे आहे. माझ्या अनुपस्थितीत झालेले आणि माझ्या उपस्थितीमध्ये झालेले सर्व कामकाज चिरंतन लक्षात रहावे म्हणून मी हा तपशील लिहिला आहे.

● **महाशिवरात्र उत्सवासाठीची जनरल सभा..** सोमवार दिनांक १० फेब्रुवारी २५ रोजी जनरल सभा झाली..४८ लोकांची उपस्थिती होती. महाशिवरात्री उत्सव व होळी उत्सव याचे नीटपणे नियोजन करण्यासाठी ही सभा बोलवण्यात आली होती. हुर्से खोत मंडळी पुण्याहून व मुंबईहून उपस्थित राहिले होते. यामध्ये ही व्यवस्थापक मंडळ गठीत करण्याचा प्रस्ताव मी सर्वांसमोर मांडला. देवस्थान प्रशासन एकहाती चालविण्यातील अडचणी सर्वांना सांगितल्या. श्री. भिकाजी यशवंत लिंगायत यांच्या नेहमीच्या पद्धतीने भाषणबाजीमुळे सभा आटोपती घेऊन समाप्त करण्यात आली. सभेला चहापान देण्यात आले व सर्वांचे आभार मानण्यात आले.

● **महाशिवरात्री उत्सव २०२५..** मंगळवार दिनक २५ फेब्रुवारी २०२५ ते गुरुवार दिनक २७ फेब्रुवारी २०२५ असा तीन दिवसांचा महाशिवरात्री उत्सव संपन्न झाला. या उत्सवात पोलीस प्रोटेक्शन मागवले होते. पोलीस प्रोटेक्शन घेऊन झालेला हा पहिलाच उत्सव होता. गडबड गोंधळ होऊन उत्सवाला गालबोट लागू नये म्हणून खबरदारी म्हणून पोलीस प्रोटेक्शन रीतसर फी भरणा करून मागवले होते. यामुळे उत्सवाचे कामकाज अगदी सुखेनैव पार पडले. रोजची पालखी प्रदक्षिणा पोलिसांच्या उपस्थितीत पार पडली. उत्सवामध्ये तीनही दिवस श्री. महेशबुवा विष्णू काणे, चिपळूण यांचे कीर्तन होते. तबला साथीला श्री. आनंद सुधाकर ओळकर, कशेळी व पेटी साथीला श्री. विनायक ठाकूर नाटे हे होते. नेहमी प्रमाणे सर्व भक्तांना 'चहापाना'ची सोय केलेली होती. महाशिवरात्री उत्सवामध्ये कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त उपयुक्त ठरला व लक्षवेधी ठरला. ठरवला तर असाही उत्सव हाऊ शकतो याची अजमावणी झाली. महाशिवरात्रीच्या रात्रीला देवाच्या पालखी प्रदक्षिणा कार्यक्रमाला श्रीदेवी भराडणीला आणण्यात आले होते. महाशिवरात्री शिवपूजन (निशिथकाल रात्री १२.२७ ते रात्री १.१६) श्री. भुस्कुटे, गोवा यांनी आयोजित केले होते.प्रथमतःच असा धार्मिक संस्कार श्रीदेवावर झाला. तीन दिवसांचा महाशिवरात्री उत्सव सुशेगात पार पडला.

● **होळी उत्सव २०२५ ..** गुरूवार दि.१३ मार्च २०२५ व धुळवड शुक्रवार दि १४ मार्च २०२५ असा दोन दिवसांचा होळी उत्सव निर्विघ्नपणे पार पडला. पारवाडी आणि हुर्सेवाडीवासीयांनी केलेले उत्स्फूर्त स्वागत आणि नेत्रदीपक रोषणाई पुढीलवर्षी पर्यंत स्मरणात राहील. विशेषतः हुर्से-पारवाडी दर्म्यानच्या बंधाऱ्यासाठी घेतलेले कष्ट कौतुकास पात्र आहेत. अशक्य ते शक्य करून दाखवले म्हणूनची शाबासकी विशेषपणे दिली पाहिजे. हुर्से पारवाडीतील युवकांची, झिलग्यांची घट्ट एकजूट वाखाणण्याजोगी होती. कुठेही कसलीही कमतरता भासू दिली नाही. हुर्श्यातील हुर्शीकरदेसाई खोत मंडळींनी पुण्यामुंबईहून येऊन सर्वांचे यथोचित स्वागत केले. त्याबद्दल त्यांचे आभार अवश्य मानले पाहिजेत. गावातील होळी श्री. श्रीधर तथा संजय देसाई यांचेकडील होती. तिथेही उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. एकूणच होळी पौर्णिमेचा उत्सव अगदी नियोजित वेळेत सुरू झाला आणि नियोजित वेळेत समारोप झाला. धुळवडीचा दिवस सुध्दा निर्विघ्नपणे आणि आनंदी उत्साही वातावरणात पार पडला. देवीच्या मांडावरची होळी दुपारी एकच्या ठोक्याला नेमात (खळग्यात) गेली. त्या होळीचा होम झाला. दुपारचा कार्यक्रम तिथे समाप्त झाला. संध्याकाळी ठीक ७.०० वा. गऱ्हाणी कार्यक्रम सुरू झाला आणि ठीक ८.०० वाजता श्रीदेवीच्या मांडावरून निशाणे वाजतगाजत श्रीदेवीच्या मंदिरात आली. प्रतिवर्षी प्रमाणे नारळाचे पाणी उपस्थित सर्वांच्या मुखी लागले. घोटभर नारळाचे पाणी वर्षभराची उर्जा आणि उत्साह टिकवून ठेवणारे वाटत रहाते. उपस्थित खोत खेळगडी मंडळींनी होळी उत्सव निर्विघ्नपणे आणि उत्साही वातावरणात पार पाडल्या बद्दल औपचारिक आभार मानले. तसेच पुन्हा एकदा व्यवस्थापक मंडळ गठीत करण्याची आवश्यकता याबाबत विचार मांडले. सन २०२५ पासून पुढे एका व्यक्तीने कारभार करणे सुलभ, सोपे नाही. अवघड होत आहे, याची जाणीव सर्वांना करून दिली. १०/१५ आसामींचा सहभाग असणारे व्यवस्थापक मंडळ कसे गरजेचे आहे हे समजावून सांगितले. व्यवस्थापक मंडळ गठीत करण्याबाबतचा विचार मी गेल्या वर्षी पासून सातत्याने सर्वांच्या पुढ्यात ठेवतो आहे..त्यावर खोत, सेवेकरी, मानकरी आदी सर्वांनी गांभीर्याने विचार करावा असे आवाहन पुन्हा एकदा केले आहे. गूळ नारळाचा प्रसाद आणि खोबऱ्याची वाटी सर्वांच्या हाती पडली. पुन्हा तासेवाजंत्री घेऊन निशाणे अंजनेश्वर मंदिरात पोहोचली. इथे धुळवडीच्या उत्सवाची सांगता झाली..

● **भराडणीमधील गोंधळ कार्यक्रम..** शुक्रवार दि. २३मे २०२५ रोजी भराडणी देवी मंदिरात गोंधळ कार्यक्रम संपन्न झाला. पावसाची दमदार हजेरी असतानाही श्री. प्रमोद उपळकर याच्या पुढाकाराने गोंधळाचा कार्यक्रम देवीच्या मंदिरात पार पडला. हा कार्यक्रम अभिनव ठरला. सुमारे २००/२५० ची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली.

● **भराडणी मंदीरामध्ये दहिकाला उत्सव..** प्रतिवर्षी दहीकाला उत्सवात भराडणी मंदीरामध्ये दोन दही हंड्या बांधल्या जातात . कांचनवाडी व कुळंबौशीचे खेळगडी ह्या दही हंड्या फोडतात. दोन तीन वर्ष हा दहिहंडी उत्सव भराडणी मंदीरामध्ये होत आहे.

● **श्रावण दिंडी..** सोमवार दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी श्रावण दिंडी जांबल वाडी मधील ब्राह्मण देव मंदिराला गेली होती. ४००/५०० भाविकांचा सहभाग होता. दोन्ही जांबलवाडीनी उत्स्फूर्त स्वागत केले. तर सोमवार दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी श्रावण दिंडी बाकाळे येथील गणपती मंदिरात गेली होती. तेथेही समस्त बाकाळे ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

● **दर्पण रजिस्ट्रेशन..** दि.१०.०७.२०२५ रोजी दर्पण रजिस्ट्रेशन करण्यात आले. रजिस्ट्रेशन नंबर MH/2025/0720285 हा क्रमांक मिळाला. भारतीय नीती आयोगाने सरकारी अनुदान स्वीकारता यावे, परदेशी फंड स्वीकारता यावा म्हणून दर्पण रजिस्ट्रेशन सर्व स्वयंसेवी संस्था व ट्रस्ट साठी बंधनकारक केले आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहारात अधिक पारदर्शकता येणार आहे.

● **12A रिन्यूऐशन.(टॅक्स एक्झंशन सर्टिफिकेट)..** श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा धार्मिक ट्रस्ट आयकर विभागाकडे नोंदणी करण्याचे भाग्य मला लाभले. प्राथमिक आयकर नोंदणी सन २०२२ मध्ये झाली व त्यानंतर सन २०२३ ते २०२७ पर्यंतचे 12A सर्टिफिकेट देण्यात आले. त्याला कायम नोंदणी क्रमांक AARTS7339F22PN01असा देण्यात आला. दि.२८.०२.२०२३ रोजीच्या तारखेचे 12A सर्टिफिकेट रिन्यूऐशन करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यापुढे दहा आर्थिक वर्ष कालावधी साठी हे रिन्यूऐशन लागू रहाणार आहे. यामध्ये सौ.नम्रता निलेश पाटणकर (सी.ए.) राजापूर यांनी सर्व आवश्यक पूर्तता माझेकडून करून घेतली आहे.

● **Tan रजिस्ट्रेशन..** KLPS16433E हा नोंदणी क्रमांक दिनांक ०९मे २०२४ रोजीच्या तारखेने टॅक्स डिडक्शन अकाऊंट नंबर म्हणून मिळाला आहे. दर तीन महिन्याने याबाबतचा रिपोर्ट आयकर खात्याकडे करावा लागत आहे.

● **विशेष जनरल सभा –** सोमवार दि. ७ जुलै २०२५ रोजी विशेष जनरल सभा बोलावण्यात आली. सभेची नोटीस पोस्ट तिकीट लावून पोस्टा मार्फत एकूण ७५ जणांना बजावणी करण्यात आली. व्यवस्थापक मंडळ गठीत करण्याबाबत ही विशेष जनरल सभा घेण्यात आली होती. उपस्थिती अतिशय कमी होती. उपस्थितांना आवाहन करून १३ जणांचे एक व्यवस्थापक मंडळ तयार करण्यात आले.

● **तुळशी वृंदावनाचे नूतनीकरण..** श्री. सचिन यशवंत लिंगायत यांनी स्वखर्चाने आपल्या आईवडीलांच्या स्मरणार्थ तुळशी वृंदावनाचे नूतनीकरण काम सोमवार ०७ मे २०२५ रोजी सुरु करून दि.१७ मे २०२५ रोजी पूर्ण करून दिले आहे. सुमारे ७०/७५ हजार खर्चाचे काम श्री. सचिन लिंगायत यांच्या मार्फत झाले आहे. तसेच चालू वर्षी रु. २५ हजारची देणगी कै. सुलोचना यशवंत आणि कै. यशवंत नीळकंठ लिंगायत यांच्या स्मरणार्थ श्री. सचिन यशवंत लिंगायत यांनी दिली आहे. यापूर्वी कै. परशुराम शंकर लिंगायत यांनी पत्नी कै. सौ. सिताबाई परशुराम लिंगायत यांचे स्मरणार्थ शनिवार कार्तिक शुद्ध एकादशी शके १८६६ दि.२८.१०.१९४४ रोजी संगमरवरी पाटी लावून ह्या तुळशीवृंदावनाचा प्लास्टर कोबा केला होता. खुद्द देवस्थानकडूनही या तुळशीवृंदावनाचे नूतनीकरण सन २०१६/१७ मध्ये प्लास्टर लादी बसवून करण्यात आले होते. नव्याने नूतनीकरण होताना पूर्वीचे प्लास्टर आदी काम काढावे लागले. नवीनीकरण होताना जुने आठवणीत राहिले पाहिजे, म्हणून हे सर्व संदर्भ लिहिले आहेत.

● **सह्याद्री वाहिनीची मन्दिर भेट..** मुंबई दूरदर्शन सह्याद्री वाहिनीची कोकणची देवभूमी सिरीज महाराष्ट्र शासनाचे वतीने प्रसिध्द होत आहे. अंजनेश्वर मंदिरासह ५६ मंदिरांचे सर्वेक्षण झाले आहे. श्री. शैलेश वाघधरे, श्री. उमेश काजवे यांच्या पुढाकाराने सह्याद्री वाहिनीच्या सर्वश्री महेश कदम, राजू धकिते, महाराष्ट्र शासनाचे माजी पी आर ओ सतिश पाटणकर, डॉ. अमेय देसाई यांनी अंजनेश्वर मंदिराला दि.१७ एप्रिल २०२५ रोजी भेट दिली. या सर्व मंदिर विश्वस्तांच्या भेटी घेऊन मंदिराचे चित्रीकरण करून विश्वस्तांच्या मुलाखती घेतल्या. त्यासाठी श्री.उमेश काजवे यांनी पाठपुरावा केला होता. अंजनेश्वर मंदिराविषयी श्री. विलास चेऊलकर, श्री राजा काजवे व श्री. उमर नाईक यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी श्री.नरेश कांबळी, श्री प्रमोद उपळकर, श्री.रविकांत वसंत लिंगायत, श्री.सिध्देश लिंगायत, श्री. शुभम लिंगायत श्री. अभय भुस्कुटे, पुणे आदि उपस्थित होते. दूरदर्शन सह्याद्री टीमच्या सदस्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. श्री शैलेश वाघधरे यांच्यामुळे हे सर्व शक्य झाले. श्री उमेश काजवे यांनी मुंबईतून पाठपुरावा केला.

● **मुहूर्ताई मंदिराचे रंगकाम..** नवरात्र उत्सव २०२५ चा साजरा होणार असल्यामुळे श्री देवी मुहूर्ताई मंदिराची रंगरंगोटी करण्यात आली आहे. मंदिर रंगकाम होऊन ६/७ वर्ष झाली असल्याने रंगकाम हाती घेण्यात आले. रंग, मजुरीचा खर्च सुमारे पन्नास हजार इतका झाला आहे.

● **अंजनेश्वर रस्त्यानजिकचे बांधकाम (४०/५० फुटाची कंपाऊंड वॉल)...**सुमारे ३००/३५० जांभा चिऱ्याचे बांधकाम श्री बाळकृष्ण तुकाराम लिंगायत यांचे घराजवळ करण्यात आले आहे. रस्ता करताना येथील जुना गडगा कोसळण्यात आला होता. त्यामुळे हे बांधकाम देवस्थानचा खर्च लावून करून घेतले आहे. सुमारे २५ हजारच्या आसपास इथे खर्च झाला आहे.

● **अहवाल छपाई..** प्रतिवर्षी अहवाल छपाई करताना सर्व संदर्भ, टिपणे, ऑडिट रिपोर्ट, देणगीदार याद्या हे सर्व तयार करून दातार छापखाना यांच्याकडे पाठवणे, प्रुफ रीडिंग करणे आदी करून छापलेला अहवाल दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर श्रीदेवाच्या पुढ्यात ठेवणे आणि नंतर त्या अहवालाची पीडीएफ कॉपी फेसबुक, व्हाटस अप, अंजनेश्वर वेबसाईट आदि ठिकाणी अपलोड करणे व त्यासोबत अहवाल प्रतींचे वितरण करणे हे काम मी अत्यंत प्रामाणिकपणे करतो आहे. हेतू इतकाच की देवस्थान कारोभाराबद्दलची सर्व माहिती थेटपणे आपल्यापर्यंत लेखीस्वरुपात पोहोचावी. दुसरा हेतू असा की भविष्यात हे सर्व वार्षिक अहवाल पुराव्याचे दस्त ऐवज म्हणून माझ्यासाठी भक्कमपणे उभे रहावेत. प्रतिवर्षाचे वार्षिक अहवाल देवस्थान रेकोर्डरूममध्ये सुरक्षित ठेवले जात असल्यामुळे अन्य हिशोबी कागदपत्रांसह हे सर्व अहवाल कुणाही आसामीला भविष्यकाळात पडताळणी करून पहाता येतील. सन २००७ ते २०२५ पर्यंतचे सर्व अहवाल एकत्रित दिसावेत म्हणून त्यासाठी एक अहवाल लिंक म्हणून शेअर केली आहे. तसेच क्युआर तयार करून सर्व अहवाल एकत्रित दिसतील अशी व्यवस्था केली आहे. अंजनेश्वर संबंधतील एकूण कामकाज सदैव उघडे उघडे रहावे. शंका शक्यता राहू नये.

● **अणुऊर्जा कंपनी मार्फत रस्ता डांबरीकरण..** अणुऊर्जा कंपनी मार्फत शिवाजी चौक ते अंजनेश्वर मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण काम करण्यात आले..

● **दर्शनासाठीची लक्ष्मणरेषा..** अंजनेश्वर मंदिरामध्ये नंदी देवतेच्या समोर उभे राहून सहजपणे दर्शन होईल या हेतूने १ फूट उंचीचे लाकडी रेलींग करून दर्शनासाठी लक्ष्मणरेषा करण्यात आली आहे. येथून दर्शन घ्यावे अशा मजकूराचे दोन बोर्ड लावण्यात आळे आहेत. काही दिवस थोड्या कडूगोड प्रतिक्रिया सहन कराव्या लागल्या .परंतु आत्ता सर्वांनाच ते सोयीचे वाटू लागले आहे. अर्थात या लक्षणरेषेचे पालन सर्वांनी प्रयत्नपूर्वक केले पाहिजे. याबाबत पुजारी वर्गाने स्वत:हून जनप्रबोधन करणे आवश्यक आहे.

● **अंजनेश्वर पथदीप योजना –** गेल्या वर्षी पासून अंजनेश्वर देवस्थान मार्फत रस्त्यावर रात्र प्रकाशासाठी उभारलेली पथदीप योजना यशस्वीरीत्या सुरु आहे. सुमारे ४५ /४६ ठिकाणी या पथदीपांची उभारणी केलेली आहे. प्रत्येक दिव्यासाठी टायमर यंत्रणा बसविलेली असल्याने चालू बंद होणे अपोआप होते. तसेच त्याबाबतचे मानधन रु.१५०/– वीज जोडणी दिलेल्यांना थेट बँकेमार्फत दिले जाते. श्री. विजय गोपाल देसाई, अमेरिका यांच्या पाच लाखांच्या देणगीतून व श्री. जयदीप ढमढरे, पुणे यांच्या पन्नास हजाराच्या देणगीमुळे ही योजना राबवता आली. भाविक भक्ताला मंदिरात येण्यासाठी रस्ता प्रकाशाची सोय व्हावी या उद्देशाने ही पथदीप योजना साकारली आहे. परंतु या मध्ये आत्ता अडचणी येऊ लागल्या आहेत. त्यामुळे ही पथदीप योजना नीटपणे राबवता येत नाही. मेंटेनन्स अधिक होत आहे. तसेच तो वेळेवर होत नाही. त्यामुळे ही अंजनेश्वर पथदीप योजना अडचणीची होत आहे.

● **जमीन टॅक्स रु.९८१/– प्रती वर्षी..** श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टच्या नावाने एकूण ३२४ सातबारा जमिनी आहेत. त्या सर्व जमिनींसाठी एकच जमीन खाते श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे यानावाने क्रमांक २१५६ अन्वये तलाठी दप्तरी नोंदलेले आहे. या जमिनीचा शेतसारा दि.१०.०५.२०२५ रोजी रु.९८१ /– देवस्थान मार्फत भरणा करण्यात आला आहे. ही सर्व जमीन देवस्थान इनाम वर्ग २ रजिस्टर मध्ये नोंदलेली आहे.

● **लोखंडी शटररेकॉर्ड रूम साठी..** श्रमिक पतपेढी साखर शाखा मिठगवाणे या ठिकाणी चोरी झाल्यामुळे काही सतर्कतेचे उपाय करण्यात आले. दस्तानाच्या खोलीच्या दोन्ही खिडक्या काढून टाकण्यात आल्या व मुख्य दरवाजाला अजून एक लोखंडी शटर बसविण्यात आले. पोलिसांनी तशा सूचना केल्या होत्या. यामुळे दास्तानाची खोली अधिक सुरक्षित झाली आहे..

● **ऑडीटींग सीसीटीव्हीचे..** पतपेढी मधील चोरी प्रकरण लक्षात घेऊन सर्व सीसीटीव्ही यंत्रणेचे ऑडीटींग करून घेण्यात आले. जी.के .इंटरप्रायझेसचे श्री. गिरीश करंबेळकर राजापूर यांनी दि.२४ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वत: सर्व सिस्टीम चेक केली आणि त्याबाबत एक प्रमाणपत्र दिले आहे.

● **भराडणी मंदीर दैनंदिन व्यवस्थापन..** भराडणी मंदिराचे श्री. प्रमोद शांताराम उपळकर पहातात. रोजची झाडलोट, साफसफाई , दिवाबत्ती, पूजा, धुपारत आदी रोजचे कामकाज ते गेली दोन वर्षे करीत आहेत. मंदिर परिसरात फुलझाडांची लागवड, नारळ, सुपारी, केळी आदीची लागवड त्यांचे पुढाकाराने शक्य झाली. केळी लागवडीतून उत्पन्न मिळू लागले आहे. तांबे, उपळकर, मणचेकर, पाटणकर , कुळकर्णी, चेउलकर आदी कुटुंबाची साथ असतेच. दर मंगळवारी संध्याकाळी ७.०० वाजता आरती होतात. तसेच सकाळी ७.१५ वाजता व संध्याकाळी ७.०५ वाजता नगारा वाजवून धुपारत होते. श्री. प्रमोद शांताराम उपळकर यांच्या पुढाकाराने हे शक्य झाले आहे. या दैनंदिन कामकाजबाबत अल्प मानधन खर्च करण्यात येत आहे. आषाढी एकादशी, दत्तजयंती गोकुळाष्टमीला भजनाचे कार्यक्रम झाले तर दहीहंडी बांधून गोकुळकाला कार्यक्रम या भराडणी मंदिरात पार पडला. भराडणी मंदिरातील नारळ, खण, साड्या, तांदूळ याची विक्री होऊन रक्कम दानपेटीमध्ये लखोटा करून जमा होते. हे सर्व श्री. प्रमोद उपळकर यानी जबाबदारी स्वीकारल्यामुळे शक्य झाले आहे.

● **दानपेट्या..आणि दानाची प्रसिध्दी..** अंजनेश्वर, मुहूर्ताई आणि भराडणी मंदिरातील दानपेटीमधून जमा झालेल्या अर्पणदानाचा हिशोब प्रसिध्दी पत्रक करून सादर केला आहे.

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. ०६.१२.२०२१ रोजी | रू.६३३७६/- |
| सोमवार | दि.२८.०३.२०२२ रोजी | रू.२६३७८/- |
| सोमवार | दि.२०.०६.२०२२ रोजी | रू.४४८९३/- |
| सोमवार | दि.१४.१०.२०२२ रोजी | रू.६६२६९/- |
| सोमवार | दि.२०.०३.२०२३ रोजी | रू.५३६९८/- |
| सोमवार | दि.१९.०६.२०२३ रोजी | रू.३८८७४/- |
| सोमवार | दि.३०.१०.२०२३रोजी | रू.५३८२५/- |
| सोमवार | दि.०४ .१२.२०२३ रोजी | रू.४४२००/- |
| सोमवार | दि.३०.०३.२०२४ रोजी | रू.५६८३९/- |
| गुरूवार | दि.३०.०५.२०२४ रोजी | रू.४०९२७/- |
| सोमवार | दि.२३.०९.२०२४ रोजी | रू.४८७८२/- |
| मंगळवार | दि. १९.११.२०२४ रोजी | रू.८०६८५/- |
| सोमवार | दि.२४.०२.२०२५ रोजी | रू.५०७७८/- |
| गुरुवार | दि.२७.०२.२०२५ रोजी | रू.१२८२०/- |
| मंगळवार | दि.१७.०६.२०२५ रोजी | रू.८१४९९/- |
| सोमवार | दि.१८.०८.२०२५ रोजी | रू.१२५५६/- |

आज पर्यंत एकूण १६ वेळा दानपेटी उघडून एकूण रू. ७,७६,७८९/- रक्कम दानपेटी जमा म्हणून राजापूर अर्बन बँकेच्या पठार शाखेत जमा झाली आहे.

(सोमवार दि.१ मार्च २०२१ रोजी महाशिवरात्री उत्सवाच्या नियोजनाच्या वार्षिक जनरल सभेमध्ये मंदीरांमध्ये दानपेटी बसविण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला होता.या सभेला सर्व खोतमंडळी, सेवेकरी, मानकरी, लिंगायतपुजारी, देणगीदार उपस्थित होते. सीसीटीव्ही रात्रप्रकाश आदीची सोय करून आणि पोलीस पहाणी करून दानपेट्या बसवण्यात आलेल्या आहेत. दानपेट्या बसवण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

दि.२ मार्च २०२१ मंगळवार, माघ कृष्ण चतुर्थी शके १९४२ रोजी मुकशाळेमध्ये दोन दानपेट्यांची स्थापना झाली.
वैशाख शुद्ध तृतीया शके १८४४ अक्षय्यतृतीया मंगळवार दि. ३ मे २०२२ नन्दी देवतेच्या दोन्ही बाजूला दोन दानपेट्यांची स्थापना झाली.
कार्तिक शुध्द नवमी शके १९४४ बुधवार दि.२ नोव्हेंबर २०२२ रोजी पालखीजवळलील दानपेटी स्थापना झाली
माघ कृष्ण द्वादशी शके १९४४ शुक्रवार दि.१७ फेब्रुवारी २०२३ रोजी श्रीदेवी भराडणी मंदीरात दानपेटी स्थापना झाली.
वैशाख शुध्द तृतीया शके १९४५ अक्षय्यतृतीया शनिवार दि.२२ एप्रिल २०२३ रोजी मुहूर्ताई मंदिरात दानपेटी स्थापना झाली.
कार्तिक कृष्ण द्वितीय शके १९४६ रविवार दि.१७नोव्हेंबर २०२४ रोजी श्री देवी भराडणी मंदीरामध्ये स्टील मध्ये घडवलेली अर्पणपेटी बसवण्यात आली... त्यामुळे साडी, नारळ, खण हे सर्व अर्पण साहित्य बंदिस्त करून ठेवायची सोय झाली आहे ..

● **देवस्थान दप्तर..कधी कुणालाही उपलब्ध..** सन २००७ ते २०२५ पर्यंतचे ऑडिटरिपोर्ट,कीर्दखतावण्या, बँक पासबुके, सोने चांदी वस्तू सामान रजिस्टर, जडवस्तूसामान रजिस्टर, स्थावर मालमत्ता रजिस्टर, मुदतठेव रजिस्टर, दानपेटी रजिस्टर, देणगीदार रजिस्टर, व्हावचर फाइल्स, देणगी पावत्या, मुदत ठेव पावत्या, जनरल सभाची प्रोसिडिंग बुक्स, सातबारा/फेरफार उतारा फाईल, आवकजावक, सर्व अहवाल आदी सर्व दप्तर देवस्थानच्या धर्मशाळेच्या खोलीत कपाटबंद ठेवून सुरक्षित ठेवलेले आहे. कधीही दप्तर तपासणी झाल्यास कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून सदरचे दप्तर क्रमवारीने लावून त्याचे एक रजिस्टर तयार करण्यात आले आहे. देणगीदार तथा देवस्थान हितसंबंधी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला दप्तराची पडताळणी कधीही करता येईल अर्थात त्यासाठी देवस्थानला देणगी फी द्यावी लागेल. सन २००७/०८ ते सन २०२४/२५ पर्यंतचे सर्वच्या सर्व ऑडीट रिपोर्ट एकत्रितपणे फाईलींग करून ठेवलेले आहेत. यावर्षी कीर्द खतावणी सह सर्व हिशोबाचे दप्तर बाईंडिंग करून घेण्यात आले आहे.

● **ऑडीटींग आणि अकाऊंटींग..** देवस्थानचे ऑडीटींगचे काम मा. श्री. निलेश नंदकुमार पाटणकर सी.ए. राजापूर यांच्याकडून केले जात आहे. सन २०२४/२५ या आर्थिक वर्षाचे ऑडीटींग करून तयार झालेला ऑडीट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या वेबसाईटला दि. ०७.०७.२०२५ रोजी पाठविण्यात आलेला आहे. तसेच देवस्थानचे टॅक्स-ऑडिट करून ते आयकर विभागाकडे पाठवण्यात आले आहे. ऑडिटच्या कामकाजामध्ये सी.ए. श्री. निलेश नंदकुमार पाटणकर, राजापूर व सी. ए. सौ. नम्रता निलेश पाटणकर या दोघांचे आणि त्यांचे ऑफीसमधील स्टाफचे सहकार्य मोलाचे आहे. देवस्थानचे अकाऊंटींग गेल्या दोन तीन वर्षांपासून टॅली सॉफ्टवेअर मध्ये करण्याचे काम श्री.सुशील चव्हाण राजापूर यांनी केले आहे. तसेच सर्व हिशोबाचे कागदपत्र पुस्तकरूपाने एकत्रित करण्यात आले आहेत. तसेच सर्व हिशोब ड्राईव्हमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहेत.

● **राजापूर अर्बन बँकेचा धर्मादाय निधी..** राजापूर अर्बन बँक लि. राजापूर यांचेकडून यावर्षीही धर्मादाय निधी रु.१५०००/- देवस्थानला प्राप्त झालेलाआहे. प्रती वर्ष राजापूर अर्बन बँक देवस्थानला धर्मादाय निधी (चारीटी फंड) देत आहे. देवस्थानकडून बँकेचे आभार मानण्यात आले आहेत. प्रतिवर्षीच्या कार्तिकोत्सवाला बँकेकडून धर्मादाय निधी दिला जात आहे. तसेच उत्सवातील चहापानासाठी रू.पाच हजार अर्बन बॅंकेने दिले आहेत. राजापूर अर्बन बँकेच्या जानशी-पठार शाखेकडून देवस्थानला पूर्ण सहकार्य लाभत आहे. उत्सवामध्ये बँकेचे मोठे सहकार्य मिळत आहे.

● **मंदिराजवळील इमारत मालमत्ता ..** शासकीय निधीतून बांधलेल्या शौचालयांच्या इमारती, भक्तनिवास इमारत, सांस्कृतिक कला केंद्राची इमारत, मंदिरा समोरील पत्राशेड या सर्व इमारत मालमत्ता श्रीदेवाच्या मालकीच्या जमीनजागेवर उभ्या असल्याने या सर्व इमारत मालमत्ता ट्रस्टच्या पीटीआरवर नोंदण्यासाठीची मी ग्रामपंचायत मिठगवाणेकडे सन २०१२ पासून सातत्याने लेखी पाठपुरावा केला होता. परंतु यामध्ये मला फारसे यश मिळाले नाही. परिणामी या सर्व इमारत मालमत्ता सर्व सामानासह ग्रामपंचायत मिठगवाणे यांच्याकडे दि.२५ जून २०२५ पासून प्रत्यक्ष ताब्यात दिल्या आहेत. शासन अनुदानाचे कारण दाखवून ग्रामपंचायत मिठगवाणे यांनी या मालमत्ता आपल्या अधिकारात, मालकी खाली राहाव्यात असे धोरण सामान्यपणे ग्रामसभेच्या माध्यमातून स्पष्ट केले होते. एकूण हे सर्व लक्षात आल्यामुळे अंजनेश्वर देवस्थानच्या सातबारावर नोंद झालेल्या इमारती मी ग्रामपंचायत मिठगवाणेकडे प्रत्यक्ष व्यवस्थापनासाठी, देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात फार आडकाठी आणली नाही. त्यामधील निवासभोजनाची जी व्यवस्था यापूर्वी देवस्थान म्हणून आम्ही पहायचो ते आत्ता यापुढे ग्रामपंचायत मिठगवाणे पाहील. भक्तनिवासमध्ये निवासभोजन व्यवस्था होण्यासाठी भाविक भक्तांना यापुढे मिठगवाणे ग्रामपंचायतीकडे संपर्क साधावा लागणार आहे. निवास/भोजन आदी व्यवस्था ग्रामपंचायत मिठगवाणे कशा पद्धतीने करणार आहे, याबाबतचे नियोजन खुद्द ग्रामपंचायत ठरविणार आहे. ही बाब सर्व भाविक भक्तांनी लक्षात घ्यावी.

